N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मानोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0511 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/07/2024 01:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 08/07/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/07/2024

**Time From (वेळेपासून):** 11:08 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/07/2024 **Time (वेळ):** 22:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 049

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/07/2024 22:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आमगव्हाण ,मानोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री अरुण निंबाजी इंगळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | इंगळे लेआउट मालेगांव ,मालेगांव,मालेगांव,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | इंगळे लेआउट मालेगांव ,मालेगांव,मालेगांव,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888567563

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश विठ्ठलराव ठाकरे | | | 1. गजानन नगर कषी उत्पन्न मंगरुपीर,मंगरुळपीर,मंगरूळपीर, वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | देविदास उर्फे दयाराम चरणदास मेहळा | | | 1. आम्गव्हाण ,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 3 | सतिष देविदास मेहळा | | | 1. आम्गव्हाण ,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 4 | देवेंद्र भिमराव कान्होडे | | | 1. आमगव्हाण ,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादि पोस्टे मानोरा दिनांक:-08/07/2024 माझे नांव -श्री.अरुन निंबाजी इंगळे वय 59 वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त ग्रामसेवक, रा.इंगळे लेआउट, बोरगाव रोड मालेगाव, ता.मालेगाव, जि.वाशिम मो.नं.8888567563 मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन दि.31/05/2023 रोजी ग्रामसेवक जिल्हा परिषद वाशिम या पदावरुन सेवानिवृत्त झालो आहे. दिनांक 05.07.2024 रोजी मी अँन्टी करप्षन ब्युरो कार्यालय वाशिम येथे गेलो असता तेथे मला पोलीस निरीक्षक श्री बालाजी तिप्पलवाड लाप्रवि वाशिम हे भेटले त्यांनामी,माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली असता त्यांनी माझी तक्रार ऐकुन घेउन दोन सरकारी पंच बोलवले व सदरची माझी तक्रार मला स्वतःचे हस्ताक्षरात दोन सरकारी पंचा समोर लिहीण्यास सांगीतली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर दोन्ही पंच,तक्रारदार म्हणून माझी व पोनि श्री बालाजी तिप्पलवाड यांनी सहया केल्या ती तक्रार पुढील प्रमाणे " वाशिम जिल्हयातील आमगव्हाण, ता.मानोरा, येथे मी दि.26/11/2019 ते 30/08/2021 पावेतो ग्रामसेवक म्हणुन कार्यरत होतो. दि.26/06/2024 रोजी मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती मानोरा यांचे मला पत्र प्राप्त झाले की, ग्रामपंचायत आमगव्हाण येथील नमुना नं.10 चे एकुण 7 पावती पुस्तके हे तत्कालीन सचिव यांचेकडे हस्तांतरीत केले नसल्याचे निर्देशनास आले असुन सदरचे पत्र प्राप्त होताच 02 दिवसाच्या आत नमुद पावती पुस्तके कार्यालयात सादर करावे. अन्यथा आपले विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल अशा आशयाचे पत्र मला प्राप्त झाले आहे. मी दि.27/06/2024 रोजी ग्रामपंचायत आमगव्हाण येथे गेलो असता तेथे मला कार्यरत ग्रामसेवक आर.व्ही.ठाकरे भेटले. त्याच ठिकाणी सरपंच पती सतिश मेहल्डे हे सुध्दा हजर होते.. मी त्यांना नमुना नं.10 चे पावती पुस्तके षोधतो असे म्हटले असता आर.व्ही.ठाकरे यंनी मला ''तक्रारदार सतिश मेहल्डे यांची नमुना नं.10 पावती पुस्तकामध्ये कर वसुली करुन ग्रामपंचायतला जमा न करता परस्पर वसुली केल्या बाबतची तक्रार मागे घेउन, नमुना नं.10 पावती पुस्तका बाबतचे प्रकरण मिटवुन मदत करतो '' असे बोलले,व सरपंच पती सतिश मेहल्डे यांनी पकरण मिटवू असे सांगीतल्याने मी तेथुन निघुन गेलो. त्यानंतर मला 20 मिनीटांनी आर.व्ही.ठाकरे यांनी त्यांचा मो.नं.9420706161 यावरुन माझे मोबाईल.नं. 8888567563 यावर कॉल केला. त्यांनी सांगीतले की हे प्रकरण मिटवून घेण्यासाठी व तुमच्यावर गुन्हा नोंद होउ नये यासाठी सतिष मेहल्डे यांनी 10,000/- रु मागीतले आहेत. मी त्यांना घरी गेल्यावर पैशाची व्यवस्था करतो. संध्याकाळी परत ठाकरे यांचा मला फोन आला व व्हाटसअँपवर एक फोन नंबर पाठवतो त्यानंबरवर पैसे पाठवा असे सांगीतले. मी त्यांना त्यांनी दिलेल्या नंबर वर सायंकाळी पाच हजार असे दोन वेळा एकुण दहा हजार रुपये त्यांना पाठवले. दोन दिवसानी माझी व ठाकरे यांची भेट झाल्यावर मला म्हणाले की, '' तुमच प्रकरण बंद झाल नसुन सतिश मेहल्डे हे 30,000/- रुपयाची मागणी करीत आहेत '' त्यावर मी त्यांना म्हटले की, '' तुम्हाला 10,000/- रु दिले '' ठाकरे मला म्हणाले की, '' दहा हजार रुपयात होत नाही अजुन 30,000/- रु लागतात '' ठाकरे,ग्रामसेवक व सरपंच पती सतिश मेहल्डे हे नमुना नं.10 पावती पुस्तका बाबतचे प्रकरण मिटवुन मदत करण्याकरीता.30,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत मला ग्रामसेवक ठाकरे व सरपंच पती सतिश मेहल्डे यांना पैसे देण्याची इच्छा नाही.ठाकरे ग्रामसेवक, व सतिश मेहल्डे यांच्याषी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा



3/5

उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुष्मनी नाही. त्यांना माझी पैसे देण्याची इच्छा नाही. आर.व्ही.ठाकरे, ग्रामसेवक ग्रामपंचायत आमगव्हाण व सरपंच पती, सतिश मेहल्डे यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. मा. बिडीओ साहेबांनी मला दिलेल्या पत्राची झेराक्स प्रत मी आपणास तक्रारी सोबत देत आहे. कारवाई होण्यास विनंती आहे."सदर तक्रार लिहुन दिल्यानंतर मला माझे मोबाईलवर.ठाकरे,ग्रामसेवक यांचा फोन आला त्यांनी मला विचारले की,''तुम्ही किती वाजे पर्यत येता'' मी त्यांना '' दिड वाजेपर्यंत येतो'' असे सांगीतले. माझे सदर तक्रारीवरुन दि. 05/07/2024 रोजी पो.नि.तिप्पलवाड,लाप्रवि स्टाफ,दोन्ही पंच व मी आम्ही सर्व ग्राम आमगव्हाण करीता रवाना झालो.मानोरा जवळ असतांना मी ग्रामसेवक ठाकरे यांना फोन लावुन विचारले की कुठे भेटायला येवु त्यावर त्यांनी मला ''मानोरा येथील विस्तार अधिकारी यांचे खोलीवर येवून भेटा'' असे सांगीतले त्यानंतर मला,पंच क्र.1 श्री कव्हर यांचेसह आर.व्ही.ठाकरे,ग्रामसेवक यांचे भेटीकरीता मानोरा येथील विस्तार अधिकारी यांची खोली येथे व्हाईस रेकॉर्डर लावुन पाठवले.त्या ठिकाणी गा्रमसेवक ठाकरे मला बिडीओ साहेबांनी दिलेले पत्र व नमुना नंबर 10 चे पुस्तक संबधाने बोलणी केली.त्या दरम्यान ग्रामसेवक ठाकरे यांनी आणलेल्या जेवणाच्या पार्सलचे 700 रु दयायला लावले. काही वेळाने त्यांनी ग्रामसेवक ठाकरे यांनी एक फोन लावला बहुतेक सरपंच/उपसरपंचास लावला होता. त्यांना फोनवर बोलले की,'' कुठे आहा,इंगळे साहेब आलेत भेटायला, तुमच्याच घरी भेटु'' असे समोरच्यास सांगीतले. त्यांनतर आमगव्हाण येथे आम्ही गेल्यावर तेथे उपसरपंच देवेंद्र कान्होडे व सरपंच पती सतिश मेहल्डे यांची भेट झाली सरपंच पती काही वेळातचं काही कामाने तेथुन गेले.ग्रामसेवक ठाकरे,उपसरपंच देवेंद्र कान्होडे व मी आमच्यात बोलणी झाली दरम्यान.ठाकरे यांनी मला ''करुन टाक,पाहा तुम्हालं जस पाहिजे तसं लिहुन घ्या..'' उपसरपंच देवेंद्र कान्होडे कामासंबधाने बोलले व आपण तुमची फक्त मध्यस्ती करुन राहीलो. असे बोलले.त्यानंतर ग्रामसेवक ठाकरे यांनी उपसरपंच देवेंद्र कान्होडे यांना म्हटले''संागा दा.. तुम्ही जी सांगीतली मागणी म्या त्याहले सांगीतली"त्यावरउपसरपंच देवेंद्र कान्होडे यांनी म्हटले ''बस मंग त्यानं मले सांगीतलं म्या तुम्हालं सांगीतलं आता तुमच्यात." त्यावर ग्रामसेवक ठाकरे मला म्हटले''याहले पाहीजे 30,000/- रुपये, सरपंच,उपसरपंच म्हणजे बाॅडीला"यावर मी ग्रामसेवक ठाकरे यांना ''थोडसंक कमी केले असते तं मी रिटायर्ड झालो या हिषोबानं काय दादा.".यावर ग्रामसेवक ठाकरे मला म्हटले''तु बार्गेनिंग करु नको."त्यानंतर मी ग्रामसेवक ठाकरे यांना म्हटलो की, ''पहिले दहा हजाराचं धरत नाही का हिषोबात." त्यावर ग्रामसेवक ठाकरे मला म्हटले की,''एैकण राजा पहिले दहा हजार तुहा मले पाठवले..ते माहयाजवळ हायेत." त्यावरमी ग्रामसेवक ठाकरे यांना म्हटलो की,'' मंग ते धरता का सोडता",ग्रामसेवक ठाकरे मला म्हटले की, ''काही नाही तेच्याषी तुहा काहिही संबध नाही." ग्रामसेवक ठाकरे मला म्हटले की ''सोमवारी दहा वाजेपर्यंत ये " त्यावर मी हो ." असे बोलुन मी पो.नि.तिप्पलवाड हजर असलेल्या ठिकाणी परत आलो.पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली.ग्रामसेवक ठाकरे यांनी 30,000/- लाचेची मागणी करुन उपसरपंच देवेंद्र कान्होडे यांनी त्यास प्रोत्साहन दिल्याने पो.नि.तिप्पलवाड यांनी सांगीतले की सोमवारी दि. 08/07/2024 रोजी सापळा कारवाई करण्यात येत असल्याचे सांगुन लाप्रवि वाषिम येथे परत आलो व पडताळणीची कागदोपत्री कार्यवाही लाप्रवि वाषिम येथे करण्यात आली.सोेमवार दि.08/07/2024 रोजी मी, दोन्ही पंच,पोउपअधि षेळके,पो.नि.तिप्पलवाड,व लाप्रवि स्टाफ असे मातोश्री सुभद्राबाई पाटील कन्या विज्ञान महाविद्यालय मानोरा चे बाजुला असलेल्या मोकळया मैदानामध्ये येवुन थांबलो. त्यांनतर पो.नि.तिप्पलवाड यांनी मला सांगीतले की,तुम्हाला लाच रक्कमेसह,व्हाईस रेकार्डर लावुन पंच क्र.01 यांचे सह ग्रामसेवक ठाकरे यांचे भेटी करीता पाठविण्यात येत आहे.मी ग्रामसेवक ठाकरे यांना फोन लावला असता त्यांचा मोबाईल स्विच आॅफ येत होता. काही वेळ गेल्यांनतर ठाकरे यांचा मला फोन आला व सांगीतले की तुम्ही सतिश मेहल्डे व उपसरपंच देवेंद्र कान्होडे यांना जाउन भेटा. त्यावर मी त्यांना म्हटले की तुम्हीच या त्यावर ते मला म्हटले की सरपंच जरा जास्त तोंड वासत आहेत तुम्हीच भेटा,त्यांनी मला उपसरपंचाचा फोन नंबर पाठवीला त्यांचषी पहिले बोला असे संागीतले. त्यावरुन मी उपसरंपच देवेंद्र कान्होडे फोन लावला असता त्यानी मला सांगीतले की मी मानोरा पंचायतसमिती येथे आहे,येवुन भेटा असे सांगीतले. पो.नि.तिप्पलवाड यांनी मला पैसे स्विकारल्यास पोउपअधि षेळके यांचे मोबाईलवर मिसकाॅल देउन पैसे स्विकारल्याचा इषारा करावा अषी सुचना देली.मला लाचरक्कमेसह व व्हाईस रेकाॅर्डर लावुन पंच क्र.01 सह माझे गाडीने पंचायत समिती मानोरा येथे पाठविले असता मला तेथे उपसरपंच देवंेद्र कान्होडे भेटले माझे कामासंबधी मी त्यांच्याषी चर्चा केली,त्यादरम्यान सतिश मेहल्उे सुध्दा आले.पंचायत समिती समोर सतिश मेहल्डे यांनी मला माझे कामासंदर्भाने,30,000/- रु व्यतीरीक्त त्यांचेसाठी 10,000/- रु ची मागणी केली.त्यादरम्यान सरपंच सासरे देवीदास मेहल्डे यांचा मला फोन आला की तुम्ही आमगव्हाण येथे घरी या.असे बोलल्याने मी माझे गाडीत बसुन पंच क्र 1 सह. मातोश्री सुभद्राबाई पाटील कन्या विज्ञान महाविद्यालय जवळ येवुन थांबलो.तेथे आमचे मागोमाग पोउपअधि षेळके,पोनी तिप्पलवाड,पंच क्र.02 व लाप्रवि स्टाफ आला. व्हाईस रेकार्डर बंद झाल्यावर मी झालेली हकीकत पोउपअधि षेळके व पोनी तिप्पलवाड यांना

सांगीतली. माझे विंनती वरुंन मला परत व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र. सह माझे गाडीने सरपंच सासरे देविदास मेहल्डे यांचे भेटी करीता आमगव्हाण येथे पाठविले. त्या ठिकाणी माझेत,सरपंच सासरे देविदास मेहल्डे व सरपंच पति सतिश मेहल्डे आमच्यात माझे कामासंबधाने संभाशण झाले. त्या दरम्यान सरपंच सासरे देविदास मेहल्डे यांनी 30,000 /- रु लाच रक्कम स्विकारली व त्यांचे पॅंटचे उजवे खिषात ठेवले व अजुन 20,000/-रु ची मागणी केली. मी त्यांना फोन पे करतो असे म्हटले असता त्यांनी मला बॅंकेतुन आताच काढुन आणा असे सांगीतले. तेंव्हा मी पोउपअधि षेळके यांना त्यांचे मोबाईलवर लाच रक्कम स्विकारलेचा इशारा केल्याने काही वेळातच पोउपअधि शेळके,पो.नि.बालाजी तिप्पलवाड,पंच क्र.02 व लाप्रवि स्टाफ आला व सतिश मेहल्डे व देवीदास मेहल्डे यांना लाच रक्कमेसह ताब्यात घेतले व आम्ही सर्व पो.स्टे.मानोरा येथे आलो. काही वेळातच लाप्रवि स्टाफ यांनी उपसरपंच देवेंद्र कान्होडे व ग्रामसेवक आर.व्ही.ठाकरे यांना ताब्यात घेउन पो.स्टे.मानोरा येथे आनले.दि.05/07/2024 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान राजेश विठठलराव ठाकरे,ग्रामसेवक,यांनी तक्रारदार सतिश मेहल्डे यांची नमुना नं.10 पावती पुस्तकामध्ये कर वसुली करुन ग्रामपंचायतला जमा न करता परस्पर वसुली केल्या बाबतची तक्रार मागे घेउन, सदरचे प्रकरण मिटवुन मदत करण्या करीता 30,000/- रु ची मागणी केली.व उपसरपंच देवंरद कान्होडे आमगव्हाण यांनी लाच रक्कमे बाबत मध्यस्ती करत असल्याचे सांगुन लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहण दिले. दि.08/07/2024 रोजी सापळा कार्यवाही 11◌:08 ते 13◌:27 वा दरम्यान सरपंच पती सतिश मेहल्डे यांनी नमुना नं.10 पावती पुस्तका बाबतचे प्रकरण मिटवुन मदत करण्या करीता 30,000/- रु चे व्यतीरीक्त स्वतःसाठी 10,000 /- रु ची मागणी केली. तसेच सरपंच सासरे देवीदास मेहल्डे यांनी 30,000/- रु लाच रक्कम स्विकारली व अजुन 20,000/- ची मागणी केली म्हणुन माझी वरील चारही आरोपीविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद पो.हवा.योगेश खोटे यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहीली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pravin utthmarao shinde(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)